प्रकरण तिसरे

# ‘उपल्या’ कादंबरीचे स्वरूप

३.१) प्रास्ताविक

३.२) कथानक

३.३) कथानकाचा आशय

३.४) व्यक्तिरेखा

३.५) गौण व्यक्तिरेखा

३.६) दलित पँथर संघटना

३.७) नामांतर चळवळ

३.८) प्रसंग

३.९) मनोविश्लेषण

समारोप

निष्कर्ष

प्रकरण तिसरे

# ‘उपल्या’ कादंबरीचे स्वरूप

## ३.१) प्रास्ताविक

मागील प्रकरणात आपण दलित कादंबरीच्या स्वरूपाचा परिचय करून घेतला. तसेच दलित कादंबरीचे निराळेपण, दलित साहित्य म्हणजे काय, याबाबत विचार केला. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपल्याला ‘उपल्या’ कादंबरीचा वाङ्मयीन अभ्यास करावयाचा आहे. शरणकुमार लिंबाळे यांच्या ‘उपल्या’ या कादंबरीमधून दलित समाजाचे चित्रण, दलित चळवळ आणि या चळवळीच्या माध्यमातून निर्माण झालेल्या संघटना यांविषयीचे चित्रण कादंबरीकाराने घडविले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळींत अनेक फेरबदल झाले. चळवळींतून संघर्षाचे सूर उमटू लागले आणि यातूनच स्पर्धा वाढल्या. लोकांनी आपल्यामागे येण्यासाठी नवीन योजनांचा शोध घेणे सुरू झाल्यामुळे आमिषांना बळी पडणारे कार्यकर्तेही निर्माण झाले. वानरांमध्ये ‘उपल्या’ नावाची जात आहे. या वानराच्या टोळीचा नायक नर असतो. मादी पिल्ले जन्माला आली की त्याला आनंद होतो. नर पिल्ले जन्माला आली की त्यांना ठार मारतो. आपल्या टोळीत सर्व माद्या असाव्यात आणि केवळ आपणच एकटे नर असावे. भोगात दुसरा भागीदार नको, अशी ‘उपल्या’ ची वृत्ती असते. त्याप्रमाणे दलित समाजातही लोकांमध्ये ‘उपल्या’ चीच वृत्ती असते. दलित समाजातही ‘उपल्या’ प्रमाणेच अनेक ‘कार्यकर्ते’ असतात. याचे वास्तव चित्रण ‘उपल्या’ कादंबरीतून दिसून येते.

## ३.२) कथानक :

‘कथानक’ हा कादंबरीचा महत्वाचा घटक आहे. मानवी मनाला कोणत्याही प्रकारच्या रहस्याविषयी एक प्रकारचे नैसर्गिक कुतूहल असते. त्यामध्ये मुख्य कथाबीज महत्वाचे मानले जाते. कादंबरीत कल्पनेद्वारे एखाद्या रहस्याची निर्मिती करून कथानकात रंजकता आणली जाते. एका घटनेतून दुसरी घटना, दुसरीतून तिसरी घटना किंवा प्रसंगांची

संगतवार आणि कलात्मक साखळी मिळून कथानक तयार होते. त्यामुळे वाचकांची उत्कंठा वाढून पुढे काय? असे कुतूहल निर्माण होते. परिणामी कथानक गतिमान बनते. कथानकाच्या तीन अवस्था असतात. प्रारंभ, मध्य आणि शेवट या अवस्था खूप महत्वाच्या असतात. याबद्दल प्र.वा. बापट व ना.वा. गोडबोले लिहितात, 'लेखकाने वाचकांच्या मनात कुतूहल निर्माण केले म्हणजे कथानकात बांधेसूदपणा येऊन कथानकाचे आकर्षणही वाढते. कादंबरीतील कथानक म्हणजे एक किंवा अनेक पात्रांच्या जीवनातील विवक्षित प्रसंगांची चतुराईची गुंफण होय.''[१] लेखक एका प्रसंगातून दुसऱ्या प्रसंगाचे विकसन करीत असतानाच उत्कंठतेचे बीजही पेरत असतो. म्हणजेच घटनेचे विकसन करत असतानाच कधी कधी प्रश्नांची उकल करण्याचाही प्रयत्न करत असतो. विशिष्ट कालक्रमाने घडलेल्या घटनांचे कथानक कादंबरीत दिसून येते.

कादंबरीतील कथानकात एकसूत्रीपणा व त्यातल्या वृत्तींमधील समानता यांना महत्व असते. निवडलेल्या घटना आणि कार्यकारण संबंधाच्या साखळीतूनच वाचकांची जिज्ञासा जागी ठेवण्याचे भान कादंबरीला ठेवावे लागते. कथानक हेच खरे तर कादंबरीचा मुख्याध्यार असते. कादंबरीत मुख्य कथानकाबरोबरच उपकथानकेही येत असतात. या दोहोंच्या गुंफणीतून आकर्षक कादंबरी लिहिली जाते. कादंबरीतील उपकथानकाच्या संदर्भात प्रा. बापट, गोडबोले म्हणतात, 'उपकथानक मुख्य कथानकाशी एकजीव झालेले किंवा साम्य-विरोधाने मुख्य कथानकावर प्रकाश टाकणारे असले तरच ते मुख्य कथानकास उपकारक ठरेल, नाही तर ती कथानके बांडगुळासारखी उगाच वाढून मुख्य कथानकास अपकारक ठरतील.[२] म्हणजेच उपकथानके ही मुख्य कथानकाला गतिमानता देण्यचा प्रयत्न करत असतात.

'उपल्या' ही दलित कादंबरी असून या कादंबरीला राजकीय आशय लाभलेला आहे. १९५६ ते १९९६ या चार दशकांतील उलथापालथीचे चित्रण या कादंबरीत दिसून येते. ही कादंबरी एकूण चार भागांत विभागली असून पहिल्या भागात एका सनातन कर्मठ

ब्राह्मण कुटुंबातल्या मुलाचे दलितीकरण कसे होते, याचे चित्रण आले आहे. तर दुसऱ्या भागात दलित चळवळ सर्व बाजूंनी ताकदीने कशा प्रकारे उभारली जाते, यामध्ये रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर नामांतर हे महत्वाचे टप्पे आहेत. दलित चळवळीने वर्णसत्ता आणि शासन यांच्याशी केलेला संघर्ष या भागात चित्रित झाला आहे, तर तिसऱ्या भागात सनातन कर्मठ ब्राह्मण कुटुंबातील मुलगी दलिताची पत्नी म्हणून जीवन सुरू करताना दिसते. चौथ्या भागात संघटित चळवळ खिळखिळी बनताना दिसते. डॉ. बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळीत अनेक फेरबदल झालेले दिसून येतात. बाबासाहेबांच्या आदर्शाने भारावलेले रोहिदास नागदिवे, मिलिंद कांबळे, गौतम गांगुर्डे, ईश्वर इंगळे, दयानंद किणीकर, विजय पगारे हे तरुण कॉलेज जीवनापासूनच दलित चळवळींमध्ये सक्रिय भाग घेऊन दलितांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरूद्ध जाब विचारताना आपल्या वैयक्तिक प्रश्नांची चिंता करत नाहीत. ज्या सवर्ण समाजाने दलितांना स्वातंत्र्यानंतरही अमानूषपणे वागणूक दिली, त्याविरूद्ध कधी आपल्या लेखणीद्वारे, तर कधी मोर्चामुळे आवाज उठवतात. कादंबरीच्या पहिल्या भागात ब्राह्मण कुटुंबात जन्मलेला अनिरुद्ध देशमुख हा तरूण चांगली टक्केवारी मिळवून हॉस्टेलमध्ये प्रवेश घेतो. त्याच्याबरोबरच दलित समाजातील मिलिंद कांबळे हा मागासवर्गीय गटातून त्याच हॉस्टेलमध्ये प्रवेश घेतो. दोघांची टक्केवारी समान असल्यामुळे त्यांना दोघांत एकच खोली मिळते पण मिलिंद हा नेहमी आपल्या दलित मित्रांबरोबर दलित चळवळ, दलित पँथर, दलित संघटना यावर नेहमी चर्चा करत असल्याने अनिरुद्धला ते सहन होत नाही. मिलिंदचा मित्र रोहिदास नागदिवे हा त्याच कॉलेजचा विद्यार्थी नापास झाल्यामुळे तो नेहमी गेस्ट म्हणून अनिरुद्धच्या खोलीत रहात असतो. अनिरुद्धच्या घरची परिस्थिती गरिबीची असते, शिवाय वडीलांचे वयही झालेले असते. घरी एक विधवा बहीण असून यांची सर्व जबाबदारी नंतर अनिरुद्धवर असते. म्हणून तो अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करण्याच्या प्रयत्नात असतो. आपल्या वर्गमित्रालाही अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करण्यास सांगतो पण त्याचे काहीच कुणी ऐकत नाहीत. हे साले कधीच कॉलेज करत नाहीत. नुसत्या फुकट सवलती लाटतात.''[३] असे मनातल्या मनात बोलून आपला राग प्रकट

करतो. अशा प्रत्येक कारणाने अनिरुद्ध रुम बदलण्यासाठी बराच प्रयत्न करतो पण त्याला रुम बदलून मिळत नाही. त्याचे बाबा त्याला सांगतात, ''आपण गरीब आहोत, नाहीतर मी तुला राहण्यासाठी दुसरी खोली भाड्याने दिली असती,'' त्याच्या खोलीत अस्पृश्य विद्यार्थी आहे हे माहित झाल्यानंतर ते अनिरुद्धला म्हणतात, ''अनि, ह्या लोकांपासून तू सावध रहा. ते नेहमीच देवाब्राह्मणाविरुद्ध वागणारे आहेत. विषारी साप आणि ब्राह्मण रस्त्यात आडवे आले तर विषारी सापाला जीवदान द्यावं परंतु ब्राह्मणाला ठेचून मारावं, तो सापापेक्षाही विषारी असतो, हे ह्यांचं तत्वज्ञान आहे. [४] बाबांचं हेच वाक्य लक्षात ठेवून अनिरुद्ध सर्व त्रास सहन करतो. रुममध्ये नेहमी संघटना, मोर्चे याविषयी बैठका होत असतात पण त्यांना तो कधीच विरोध करत नाही. सवर्ण विद्यार्थी त्याला 'जयभीम' म्हणून चिडवत होते तर दलित विद्यार्थी बामण म्हणून चिडवत होते. यातून तो भरडला जात होता. एकदा रुममध्ये बैठक सुरू असताना अनिरुद्ध प्रवेश करतो, तेव्हा खूप भडकतो व म्हणतो, ''आपण विद्यार्थी आहोत व इथं शिक्षणासाठी आलो आहोत, सरकार तुम्हाला सवलती देते, त्याचा तुम्ही फायदा करून घ्या. नापास व्हाल आणि रोहिदाससारखी अवस्था होईल.'' यावर दलित समाजावर होणाऱ्या अन्यायाची माहिती देताना रोहिदास म्हणतो की, ''मला माझ्या मूलभूत गरजांपेक्षा माझे मुलभूत हक्क प्रिय वाटतात. गेल्या दोन वर्षात मला जे शिकायला मिळाल ते जगाच्या कुठल्याही विद्यापीठात शिकायला मिळणार नाही''[५] रोहिदासची ही वस्तुस्थिती ऐकून अनिरुद्धला त्यांच्या दु:खापुढे आपले दु:ख काहीच नाही, याची जाणीव होते. दलित तरुणांच्या मनात सवर्णांविषयी असणारा असंतोष तो जवळून पाहत असतो म्हणून त्यांना विरोध करण्याचे दु:साहस न करता त्यांच्यात मिळूनमिसळून राहतो.

कॉलेज शिक्षण घेत असताना गौतम गांगुर्डे, भीमा भोळे, पंडित कानडे हे चळवळे तरुण विद्यार्थी म्हणून त्यांना हॉस्टेलमध्ये प्रवेश नाकारला जातो. त्यापैकी गांगुर्डे हा रिपब्लिकन स्टुडण्ट असोसिएशनचा उपाध्यक्ष असतो. त्यांच्या संघटनांच्या बैठकीसाठी निकम मामांच्या घरी एक खोली भाड्याने घेऊन राहत असतात. दलित विद्यार्थ्यांच्या तालुका व जिल्हा पातळीवर अनेक संघटना होत्या. कोणी आपल्या संघटनेच नाव 'दलित

युवक आघाडी', तर कोणी 'रिपब्लिकन युवक आघाडी', याशिवाय वस्तीपुरत्या, चौकापुरत्या अनेक संघटना अस्तित्वात होत्या. या संघटना छोट्या व सुट्या असल्यामुळे त्यांना एक ठराविक व्यासपीठ नव्हतं. शासन - दरबारी त्यांचे प्रश्न मांडले जात नव्हते. त्याचबरोबर त्यांच्या प्रश्नांकडे वर्तमानपत्रांची नजरही जात नव्हती. या संघटना एकाच बॅनरखाली येणं गरजेचं असल्याने त्यातून एकच नोठी अशी 'दलित पँथर' नावाची संघटना स्थापन झाल्यामुळे दलित तरुणांमध्ये उत्साहाचं वातावरण निर्माण झालं होतं. या संघटनेचे अध्यक्षपद गौतम गांगुर्डे यांच्याकडे होते. इतरत्र स्वार्थासाठी आपला उपयोग करून घेतला जातो, याची जाणीव झाल्याने अनेक संघटनांतील कार्यकर्ते स्वत:हून या संघटनेमध्ये प्रवेश करत होते. ईश्वर इंगळे हा तडीपार झालेला गुंड होता. इंदिरानगर झोपडपट्टीत त्याचेच वर्चस्व होते. त्याने पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी शिवसेनेत प्रवेश केला होता. त्याच्याच भागात मधू कावळे हा तडीपार झालेला 'दादा' होता. तोही शिवसेनेत होता. यातूनच कावळे व इंगळे यांच्यात स्पर्धा सुरू झाली. या राजकारणाला कंटाळून ईश्वर इंगळे दलित पँथरमध्ये प्रवेश करतो.

एके काळी दलित संघटनेमध्ये गौतम गांगुर्डे, भीमा भोळे, मिलिंद यांच्याबरोबर काम करणारा दयानंद किणीकर सर्व संघटना सोडून दलित साहित्यावर लिखाण करणारा लेखक म्हणून उदयास येतो. कॉलेजमधील मित्र अनिरुद्ध देशमुख याच्या विधवा बहिणीशी लग्न करून तो तिला सुखात ठेवण्याचा प्रयत्न करतो. प्रा. राहूल बनसोडेंच्या जागेवर त्याच संस्थेमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू होतो. लेखक आणि प्राध्यापक असल्याने त्याला अनेक कार्यक्रमांना निमंत्रित केले जायचे. हिंदुत्ववाद्यांच्या व्यासपीठावर गेल्याने त्याच्यावर टीका होऊ लागली. चळवळीतील कार्यकर्तेही नाराज झाले. चळवळीपासून बाजूला करण्यात आल्याने कार्यक्रमाला बोलावणे बंद झाले तरीही दयानंद कार्यक्रमाला गेला तर अनेक लोक त्याला ''तुम्ही हिंदुत्ववादी आहात का ?''[६] असा प्रश्न विचारायचे, या सर्व घटना चालू असतानाच दयानंद जळगावच्या महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रम गेला होता. त्याच्या हस्ते उद्घाटन होते; कार्यक्रमही छान झाला पण अचानक कॉलेजचे

विद्यार्थी आले त्यांनी दयानंदच्या तोंडाला काळे फासून 'हिंदुत्ववाद्यांचा निषेध असो' अशा घोषणा देत निघून गेले. अशा तऱ्हेने त्याचा अपमान होतो.

चळवळीतील एकएक कार्यकर्ता यामुळे चळवळींतून बाजूला होतो आणि चळवळ खिळखिळी बनते. त्यातीलच रोहिदास नागदिवे हा खंदा कार्यकर्ता मंत्रिपदापर्यंत आपल्या अनुभवाने व स्वकर्तृत्वाने मजल मारतो. रिपब्लिकन पक्ष आणि काँग्रेसच्या युती काळात रोहिदास मंत्री होतो. रोहिदासचा बालमित्र विजय पगारे वेगवेगळ्या पार्ट्यांना घेऊन भेटू लागतो. कुणाला बदली हवी असते, तर कुणाला बिअर बारचा परवाना हवा असतो. या कामांसाठी काहीही पुरवायची तयारी असते पण रोहिदासचा जवळचा मित्र गौतम गांगुर्डे हा त्याचा पी.ए. असतो. लोकांनी कामासाठी दिलेले पैसे तो हडपतो. मंत्र्याला याची जराही कूणकूण लागू देत नाही. शेवटी केवळ आश्वासन देणारा मंत्री म्हणून रोहिदास शिल्लक राहतो. एके काळचे चळवळीचे कार्यकर्ते झटपट पैसे मिळविण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात आणि चळवळ संपल्यातच जमा होते. नव्या जोमाने चळवळ उभी करण्याची इच्छा कोणातही नसते. निवडणुका जाहीर होतात आणि रोहिदासचे मंत्रिपद संपुष्टात येते. त्यावेळी सदैव असणारा लोकांचा गराडा नंतर कमी होतो. लोक आता विचारत नाहीत, शिवाय मंत्रिपद संपुष्टात आल्यानंतर सरकारी बंगला सोडला, तेव्हा साधी भाड्याची खोली शोधायलाही कुणी मदत करत नाही. त्याचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणदिनी दर्शनासाठी चैत्यभूमीवर गेलेल्या रोहिदासला एके काळी चळवळीत एकत्र काम केलेल्या चंद्रकात आंभोरेया मित्रांचे कार्यकर्ते, धक्काबुक्की करून कपडे फाडतात, त्याला त्या ठिकाणी दर्शन घेऊ देत नाहीत. या घटनेतून चंद्रकांत आंभोरेचा स्वार्थीपणा दिसून येतो व वानरांप्रमाणेच माणसातही 'उपल्यांची' वृत्ती दिसून येते. स्वत:च्या भोगात त्यांना दुसरा भागीदार नको असतो.

### ३.३) 'उपल्या' कादंबरीचा आशय :

'उपल्या' ही दलित चळवळींचे चित्रण करणारी कादंबरी असून या कादंबरीला राजकीय आशय लाभलेला आहे. १९५६ ते १९९६ या चार दशकांमधील दलित चळवळींवर उलथापालथीचे चित्रण लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी करून दलित चळवळीवर प्रकाश टाकलेला आहे. कादंबरीच्या नावाविषयी लेखकाने प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे की 'वानरांमध्ये 'उपल्या' नावाची जात आहे. या वानरांच्या टोळीचा नायक नर पिल्ले जन्माला आली की ठार मारतो, मादी पिल्ले जन्माला आली की त्याला आनंद होतो. खरे तर 'उपल्या' ची वृत्ती ही सर्वसाधारणपणे सर्वच प्राण्यांमध्ये थोड्याफार फरकाने आढळून येते. ज्या महान नेत्याने दलित चळवळ सुरू केली, त्यामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ध्येये, उद्दिष्टे वेगळी होती. त्यांनी दलित समाजाला एकत्र करून 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हा मूलमंत्र देऊन, दलित समाजाला शिक्षणासाठी प्रोत्साहित करून स्वत:वर होणाऱ्या अन्याय, अत्याचारांविरुद्ध दाद मागण्यास सक्षम केले. सर्व दलित तरुणांना संघटित राहण्याचे आवाहन केले. पण बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळी, तरुण यांच्यामध्ये फूट पडून दलित चळवळ आपणच चालवावी, दलित चळवहीचा मीच खरा नेता, असे समर्थन सुरू झाले. कालांतराने 'माझी चळवळ खरी की तुझी चळवळ खरी' हा प्रश्न बाजूला पडला व 'माझी चळवळ मोठी की तुझी चळवळ मोठी' हा प्रश्न ऐरणीवर आला. प्रत्येक गट, संघटना आंबेडकरी जयंत्या साजरी करू लागल्या. कोणाची जयंती मोठी, कोणाचा मंडप चांगला यातून स्पर्धा वाढू लागल्या व लोकांनी आपल्यामागे येण्यासाठी नवीन युकत्यांचा शोध घेणे सुरू झाले. डॉ. बाबासाहेबांच्या आदर्श विचारांनी भारावलेले तरुण चळवळीमध्ये सक्रिय कार्यकर्ते म्हणून सहभागी होऊन सुरुवातीला नि:स्वार्थी, एकनिष्ठ वृत्तीने पोटतिडकीने काम करत असतात. दलित समाजातील गरीब, अडाणी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्वस्व अर्पण करतात. हे सर्व करताना ते स्वत:च्या भविष्याचीही पर्वा करत नाहीत. पण हाच कार्यकर्ता भविष्यात नेता

झाला की पूर्णपणे बदलतो. तो भ्रष्टाचारी बनतोच व शिवाय राजकीय बाहुले बनल्यामुळे स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ शकत नाही.

१९५६ ते १९९६ या चार दशकांचा विचार करता असे लक्षात येते की रिपब्लिकन पार्टी, दलित पँथर आणि दलित चळवळीशी संबंधित असणाऱ्या इतर पक्षांच्या दलित नेत्यांना अस्तित्व नाही. रोहिदाससारख्या मंत्र्याला कॅबिनेट दर्जाचे मंत्रिपद मिळूनही तो आपल्या समाजातील छोटे – मोठे प्रश्न सोडवू शकत नाही, यामुळेच तो अविश्वासू मंत्री ठरतो. आपल्या समाजातील एक चांगला कार्यकर्ता मंत्री झाल म्हणून दलित समाजातील विजय पगारे, निकम मामा यांसाखे लोक आपली समस्या सोडवण्यास मदत करतील या स्वाभाविक भावनेने आपल्याबरोबर इतर मंडळींना घेऊन भेटतात पण तो मंत्री आपल्या बांधवांचे प्रश्न सोडविण्यास असमर्थ ठरतो. याचे मुख्य कारण म्हणजे गौतम गांगुर्डे या कार्यकर्त्याच्या मध्यस्थीने आपली समस्या पोहचविण्यासाठी विजय पगारे धडपडतो पण त्याचा विश्वासघात नेमका गौतम गांगुर्डे हा कार्यकर्ताच करतो. तो लोकांच्या समस्या दलित मंत्र्यापर्यंत घेऊनच जात नाही. स्वत:च त्या पैशाचा वापर करतो. परिणामी लोकांची कामे होत नाहीतच पण मंत्री आणि नेतेही बदनाम होतात शिवाय कार्यकर्ताही स्वार्थी बनतो. या चळवळीतील बदलांचे सूक्ष्म चित्रण कादंबरीतून दिसून येते.

'उपल्या' ही कादंबरी एकूण चार भागांत विभागली असून कथानक मांडणीमध्ये प्रकरणे सलग नाहीत. प्रत्येक भागात नायक व घटनाही वेगळ्या असल्याचे दिसून येते. यामुळे कादंबरीत एकसंधपणा जाणवत नाही. यातील पहिल्या भागात ब्राह्मणवर्गातील मुलगा दलित कसा होतो, याचे चित्रण केले आहे, तर दुसऱ्या भागात दलित चळवळ मोठ्या ताकदीने उभी राहते याचे चित्रण आले आहे. यामध्ये दलित चळवळ दलित पँथर या संघटनांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. तिसऱ्या भागात एका ब्राह्मण कुटुंबातील मुलगी दलिताची पत्नी होऊन संसाराला सुरुवात करते. या भागात स्वातंत्र्यानंतर ब्राह्मणांमध्ये झालेला बदल दिसून येतो. आजमितीला नव्या पिढीमध्ये बऱ्याच अंशी बाह्यवर्तनात बदल

झालेला दिसून येतो. ब्राह्मणांनी ब्राह्मण असणे, दलितांनी दलित असणे हे व्यवस्थेला हवे असते पण ब्राह्मणांनी दलित होणे आणि दलितांनी ब्राह्मण होणे हे व्यवस्थेला मंजूर नसते.

शेवटचा भाग हा 'उपल्या' कादंबरीचा महत्वाचा टप्पा आहे. विजय पगारे या कार्यकर्त्यांच्या निवेदनातून वर्तमानातील इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कथानक मांडणीमध्ये कांदबरीचे भाग सलग नाहीत. शिवाय चौथ्या भागात दैनंदिनीचा वापर केल्यामुळे कादंबरीचा पूर्वार्ध व उत्तरार्ध वाटतात. दलित चळवळीच्या नेत्यांना आपल्या वास्तवाचे भान आणून देणारी ही कादंबरी असल्याचे दिसून येते.

**३.४)व्यक्तिरेखा – व्यक्तिचित्रण :**

व्यक्तिरेखा हा कादंबरीचा महत्वाचा घटक आहे. कादंबरीचा दर्जा ठरविण्यासाठी व्यक्तिरेखांना कादंबरीमध्ये महत्वाचे स्थान असते. कादंबरीत घडणाऱ्या घटना ज्यामुळे घडतात, त्यास 'व्यक्तिरेखा' व्यक्तिरेखाशिवाय कथानकाला पूर्णत्व प्राप्त होत नाही. मानव हा साहित्याचा मुख्य विषय असल्याने साहित्याच्या कथानकामध्ये श्री. मा. कुलकर्णी यांनी म्हटले आहे, 'कादंबरीतील पात्रे वास्तव व जिवंत असावीत. त्यांचे वर्णन स्वाभाविक व सुसंगत असावे.[७] कादंबरीत व्यक्तिरेखांचा विचार करता मुख्य व्यक्तिरेखा, गौण व्यक्तिरेखा, पूरक व्यक्तिरेखा अशा अनेक व्यक्तिरेखा येत असतात. कादंबरीतील व्यक्तिरेखा कशा असाव्यात त्यासंबंधी बापट – गोडबोले म्हणतात, 'कादंबरीतील पात्रे काल्पनिक खरी पण त्यांच्यात जिवंतपणा येण्यासाठी त्यांना देव किंवा दानव कोटीतील करण्याऐवजी मानव कोटीतील करणेच गरजेचे आहे.[८] म्हणजेच कादंबरीत व्यक्तिरेखा निर्माण करण्यासाठी सभोवतलाच्या सृष्टीचे मार्मिक निरीक्षण करावे लागते. पात्रचित्रणाशिवाय कादंबरीच्या कथानकाला आकार येत नाही. कादंबरीतून पात्रांचे व त्यांच्या भावभावनांचे चित्रण असते.

'उपल्या' ही दलित कादंबरी चार भागांमध्ये विभागली असून त्यातील अनिरुद्ध देशमुख, दयानंद किणीकर, मिलिंद कांबळे, विजय पगारे या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. या व्यक्तिरेखांच्या अनुषंगाने व दलित चळवळीतील कार्यकर्ते म्हणून रोहिदास नागदिवे, गौतम

गांगुर्डे, ईश्वर इंगळे या व्यक्तिरेखांचा ही समावेश होतो. वरील सर्व व्यक्तिरेखांबरोबरच निकममामा, भीमा भोळे, रमा बाबर, प्रा. राहूल बनसोडे, दलित लेखक त्रिशरण आदी गौण व्यक्तिरेखा ही या कादंबरीत येतात.

**व्यक्तिरेखा :**

*** अनिरुद्ध देशमुख :**

अनिरुद्ध हा गरीब ब्राह्मण कुटुंबातील मुलगा असतो. महात्मा गांधीजींची हत्या झाली, तेव्हा एका माथेफिरू ब्राह्मणानं गांधीजींची हत्त्या केल्याच्या निषेधार्थ सर्वच ब्राह्मणांविरोधी सुडाची लाट उसळली. अनेक ठिकाणी ब्राह्मणवाड्यांवर हल्ले झाले, त्यात अनिरुद्धचे घरही भस्मसात झाले. बाबांचा सनातनी स्वभाव असल्याने गावात विठ्ठलाचे मंदिर बांधले होते, गावांत हायस्कूल काढले होतं. घराघरात पूजा सांगितली होती पण गावाने या सर्वांवर पाणी सोडून त्यांच्या वडीलांची विटंबना केली आणि गावातून हाकलून दिले. अनिरुद्धच्या वडीलांनी गाव कायमच सोडलं. आईचा स्वभाव खूप सोशिक असल्यामुळे तिला हा धक्का सहन झाला नाही. ती अनिरुद्ध व लहान भावनाला सोडून देवाघरी गेली. दोन्ही मुले आईविना पोरकी झाली. बाबांनी भिक्षुकी करून दोघांना वाढवलं आणि अनिरूद्ध माधुकरी मागून शिकला.

अनिरुद्ध कॉलेजचं शिक्षण घेण्यासाठी वसतिगृहात प्रवेश घेतो. हे वसतीगृह आर्य समाजाचे असल्याने सर्व जातीधर्मातील विद्यार्थ्यांना टक्केवारीनुसार प्रवेश दिला जातो. त्याच्या वस्तिगृहातल्या खोलीमध्ये रूमपार्टनर म्हणून त्याच्याच टक्केवारीचा दलित विद्यार्थी मिलिंद कांबळे रहातो. अनिरुद्ध गरीब स्वभावाचा असल्याने सर्वच बाबतीत त्याचे खच्चीकरण होते ; आणि एका सनातन ब्राह्मण कुटुंबातील मुलाचे 'दलितीकरण' होण्यास प्रारंभ होतो. त्याचा रूमपार्टनर दलित असल्याने त्याच्या रूममध्ये नेहमी दलित पँथर, दलित चळवळी व दलित विद्यार्थ्यांच्या संघटनेविषयी चर्चा व्हायच्या. या दररोजच्या बैठका, चर्चा, मिटींग यांना वैतागून अनिरुद्ध प्राचार्य, मराठे हवालदार यासारख्या अनेक लोकांना

भेटून रूम बदलून देण्याची विनंती करतो पण त्याचे म्हणणे कुणीही ऐकत नाही. शेवटी आहे त्या खोलीत राहून आपल्या घरच्या परिस्थितीची जाणीव असल्याने अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करतो. ज्यावेळी अनिरुद्धला त्याचे बाबा वसतिगृहात भेटायला येतात, तेव्हा तेथील भिंतीवर आंबेडकरांचे कॅलेंडर लावलेले पाहून व बाबांच्या डोळ्यांत पाणी साकळते. त्यावेळी बाबा आपली खंत व्यक्त करताना म्हणतात, ''बाळ आपण गरीब आहोत, गरिबाला आवड - निवड नसते ; श्रीमंत असतो, तर तुला स्वतंत्र खोली घेऊन दिली असती. प्राप्त परिस्थितीत आहे ते उत्तम आहे. पूर्वीचा काळ आता राहिला नाही.''[१]

सुरुवातीला रुम पार्टनर मिलिंद व त्याचा गेस्ट रोहिदास यांच्याविरुद्ध बोलण्याचा प्रयत्न केला पण त्यांच्यापुढे त्याचे काहीही चालत नाही. रुमपार्टनर दलित असल्यामुळे वसतीगृहातील व कॉलेजमधील सवर्ण विद्यार्थी त्याला 'जयभीम' म्हणून चिडवत होती, तर दलित विद्यार्थी 'बामण' म्हणून हिणवत होते. अनिरुद्ध दोन्हीकडून भरडला जात होता पण या सर्वांवर मात करून अनिरुद्ध शिक्षण घेतो, कारण, त्याच्या विधवा बहिणीचीही जबाबदारी त्याच्यावरच असते. अनिरुद्धचा कॉलेज मित्र दयानंद किणीकर भावनाशी आंतरजातीय विवाह करून तिला सुखी ठेवतो. कालांतराने अनिरुद्ध आपले शिक्षण पूर्ण करून फौजदार होतो व मराठे हवालदाराच्या मुलीशी तोही आंतरजातीय विवाह करतो. नामांतर चळवळ सुरू असताना हडोळती, जळकोट, वादोना या गावांत दंगल सुरू होते, ती थांबवण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपविली जाते. जळकोटला ड्यूटीवर असताना अनिरुद्धला जमावाकडून लाथाबुक्क्यांनी, दगडांनी ठेचून घायाळ केले जाते. त्याला अर्धमेल्या बेशुद्ध अवस्थेतच पोलिस स्टेशनमध्ये जिवंत जाळतात आणि एक सहनशील पोलिस अधिकारी आपल्या प्राणास मुकतो.

*** रोहिदास नागदिवे :**

रोहिदास नागदिवे हा दलित तरूण महाविद्यालयीन जीवनापासून दलित विद्यार्थी संघटनेचा सक्रिय कार्यकर्ता असतो. शिक्षणाबरोबरच तो संघटनेमध्ये काम करून आपले

हक्क मिळविण्याचा प्रयत्न करतो. दलित समाजातील लोक त्याच्या संघटनेकडे अनेक छोटे – मोठे प्रश्न घेऊन येतात. हे प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेतील कार्यकर्त्यासह तो मोर्चा काढून हल्ले करतो. दलितांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांविरुद्ध आवाज उठवितो. आपल्या हक्कांसाठी लढताना अभ्यासाकडे थोडे दुर्लक्ष होऊन तो नापास झाल्यामुळे व त्याचा वसतिगृहातील प्रवेशही नाकारला जातो. पण त्यांची प्राचार्यापासून रेक्टरपर्यंत ओळख असल्याने व कॉलेजचा जुना विद्यार्थी असल्याने तो सतत 'गेस्ट' म्हणून वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या रुममध्ये राहत असतो. पांगरी गावातल्या दलितांच्या बाजूने सर्व संघटनेतील विद्यार्थी लढले होते व त्यांनी पांगरीच्या दलितांना न्याय मिळवून दिला होता. कॉलेजमध्येही त्याचे वर्चस्व होते. दलित विद्यार्थ्यांच्या सर्व संघटना त्याच्या निर्णयावरच चालत होत्या. आजपर्यंत दलितांच्या ज्या संघटना होत्या, त्या सर्व संघटनांना एकच एक व्यासपीठ नव्हतं, संघटना अलग-अलग असल्यामुळे वर्तमानपत्रांची नजरही त्यांच्याकडे जात नव्हती किंवा संघटनांचे प्रश्नही मंत्रिमंडळात मांडले जात नव्हते, यासाठी सर्व संघटनांची मिळून एकच एक अशी 'दलित पँथर' ही संघटना गौतम गांगुर्डे, भीमा भोळे, पंडित कानडे स्थापन करतात. या संघटनेला सुरुवातीला रोहिदासाचा विरोध असतो, पण कालांतराने त्याचे मतपरिवर्तन होऊन तो 'दलित पँथर' मध्ये प्रवेश करतो. १५ ऑगस्टच्या 'भूमी बळकाव' आंदोलनामध्ये इतर कार्यकर्त्यासह आंदोलनात भाग घेतो. योगायोगाने निवडणुकीला उभा राहून निवडणुकही जिंकून. समाजकल्याण खात्याचा कॅबिनेट मंत्री होतो. आपल्या समाजातील संघटनेचा कार्यकर्ता, तसेच जवळचा मित्र मंत्री झाल्यामुळे रोहिदासचे मित्र संघटनेचे वेगवेगळे छोटे-मोठे प्रश्न, तसेच इतर पार्ट्यांना घेऊन रोहिदासला भेटत असतात. यासाठी पार्ट्यांची काहीही पुरवायची तयारी असते. त्याचाच एके काळचा मित्र गौतम गांगुर्डे हा रोहिदासचा 'पी.ए.' बनतो. लोकांनी कामासाठी दिलेले पैसे स्वत:च्या स्वार्थासाठी वापरतो. मंत्र्याला यातील काहीही कळू देत नाही. परिणामी पैसे घेऊनही लोकांची कामे होत नाहीत यावरुन लोकांचा रोहिदासवरचा विश्वास उडाल्याने तो आपल्याच समाजबांधवांचा अविश्वासू मंत्री ठरतो. दरम्यान्यानच्या काळात निवडणुका

जाहीर होतात आणि रोहिदासचे मंत्रिपद संपुष्टात आल्यामुळे त्याच्याभोवती असणारा लोकांचा गराडाही कमी होतो. सरकारी बंगला रिकामा करण्याची वेळ येते, तेव्हा त्याला रहायला एक भाड्याने खोलीही कोणी मिळवून देत नाहीत. त्याच्या सतत जवळ असणारे लोक सुद्धा त्याला किंमत देत नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणदिनी दर्शनासाठी चैत्यभूमीवर गेलेल्या रोहिदासला त्याचाच एकेकाळचा मित्र व संघटनेतला कार्यकर्ता असलेल्या चंद्रकांत आंभोरे या दलित नेत्याचे कार्यकर्ते धक्काबुक्की करून खाली पाडतात, व त्याला चैत्यभूमीवर दर्शन घेऊ देत नाहीत. लोकांची कामे न केल्याने तो आपल्याच समाजबांधवांच्या रोषाला बळी पडतो.

*** दयानंद किणीकर :**

दयानंद किणीकर याचे खरे नाव 'कचरु' हरिजन. त्याने कचरुच 'दयानंद' हे टोपणनाव केलेल व त्याचे गाव किणी असल्यामुळे किणीकर हे आडनाव लावून घेतो. तो दलित लेखक असल्याने संपादक त्याच्या कविता छापत नसत, म्हणून त्याने आपले नाव बदलून घेतले होते. दयानंदचा जन्मच एका दलित, दरिद्री कुटुंबात झाल्याने त्याला लहानपणापासून अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागले. घरचे अपार दारिद्र्य ; दयानंदची आई काशी व वडील महादेव असं तिघांच कुटुंब त्यांच्या गावाजवळ घाटाच्या मध्यावर असणाऱ्या बोरीच्या झाडाखाली म्हसोबाच्या मंदिराजवळून जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील वाहनांचा वेग कमी व्हायचा, त्यावेळी वाहनांतून प्रवास करणारे लोक लहान मुलांचे जुने कपडे बोरीच्या झाडावर फेकायचे, म्हसोबापुढे नाणी फेकायचे. आई कपडे गोळा करायची व वडील नाणी जमा करायचे. यावरच त्यांची गुजराण चाले. अशीच एकदा बस येते ; लोक पैसे टाकतात ; वडील पैसे गोळा करण्यासाठी धावतात व भरधाव येणाऱ्या ट्रकचं चाक वडिलांच्या डोक्यावरून जाते. चेहऱ्याचा चेंदामेंदा झाल्याने या अपघातात वडील कायमचे हे जग सोडून जातात. घरातील अपार दारिद्र्य असूनही दयानंदला बोर्डिंगमध्ये रहावे लागते. आई गावी एकटीच राहते पण कालांतराने ती दयानंदचा विचारही न करता ट्रकवाल्याबरोबर

पळून जाते. लहानपणापासूनच त्याने अशा प्रसंगांना तोंड दिलेले असते. लोकांच्यावर व आपल्याच कुटुंबावर होणारे अन्याय – अत्त्याचार त्याने जवळून पाहिलेले असतात. त्यातूनच तो 'दलित पँथर' या संघटनेमध्ये प्रवेश करून याविरुद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न करतो. बावी गावात घडलेल्या घटनेमध्ये भाग घेऊन ते प्रकरण धसास लावतो. 'दलित पँथर'मध्ये काम करताना संघटनेतील कार्यकर्ती रमा बाबर या तरूणीशी ओळख होते. ओळखीचे रुपांतर प्रेमात होते पण हे प्रेम सफल होत नाही. त्याचाच एके काळच्या कॉलेजचा मित्र अनिरुद्ध देशमुख याची विधवा बहीण भावना हिच्याशी आंतरजातीय विवाह करून तिला सुखी ठेवतो. त्यांच्या संसारवेलीवर 'विवेक' या मुलाच्या रुपानं सुंदर फुल उमलतं आणि सुखाचा संसार सुरू होतो. पँथरमध्ये काम करत असतानाच संघाच्या कॉलेजमध्ये त्याला प्रा. राहूल बनसोडेंच्या जागेवर प्राध्यापक म्हणून नोकरी मिळते. दयान्द प्राध्यापक व लेखक असल्यामुळे त्याला अनेक हिंदुत्ववादीही कार्यक्रमाला बोलावतात पण त्याच्यावर त्याचाच समाज 'हिंदुत्ववादी' म्हणून टीका करू लागतो. जळगावच्या वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमात त्याच्या तोंडाला दलित विद्यार्थी काळे फासून त्याचा निषेध करतात.

*** मिलिंद कांबळे :**

मिलिंद हा दलित विद्यार्थी असून आर्य समाजाच्या महाविद्यालयात शिकत असतो. कॉलेजच्या होस्टेलवर राहूनच तो दलित विद्यार्थी. संघटने चा व 'दलित पँथरचा' सक्रिय कार्यकर्ता म्हणून काम करत असतो. दलितांवर होणाऱ्या अन्याय – अत्याचारांविरुद्ध जाब विचारण्यासाठी त्यांच्या संघटनेतील कार्यकर्ते सदैव तत्पर राहून काम करत असतात. समता सैनिक दलाची शाखा समारंभपूर्वक पँथरमध्ये प्रवेश करणार होती. त्यासाठी भव्य सभा होणार होती. या सभेला प्रचंड गर्दी झाली होती. या सभेतच मिलिंद मनुस्मृतीची होळी करतो. सुशिक्षित बेकार तरुणांच्यासाठी तो आमरण उपोषण सुरू करतो. सेवायोजन कार्यालयात भ्रष्टाचार वाढला आहे. तो निपटून काढला पाहिजे. फक्त ओळखीच्यांना

मुलाखतीची पत्रे दिली जातात. नाव नोंदवून दहा वर्षे झाली तरी एकही मुलाखतपत्र मिळत नाही. नाव नोंदवून पाच वर्षे झालेल्या[१०] बेकारांना दरमहा पाचशे रुपये बेकार भत्ता मिळाला पाहिजे'. अशा मागण्यांसाठी मिलिंदने उपोषण केल्यामुळे तरुण वर्गातून त्याला वाढता पाठिंबा मिळत होता.

पडिक जमिनीवरील अतिक्रमणातील आंदोलनांतही त्याने भाग घेतला होता. ''पडिक जमिनीवरील अतिक्रमण हा गुन्हा नाही. ज्या जमिनीतून पीक येत नाही, त्या जमिनीतून आपण पीक काढणार आहोत. आपण उत्पन्न वाढवत आहोत[११] अशी पोटतिडकीने आपली भूमिका मांडतो. 'दलित पँथरचा' अध्यक्ष ईश्वर इंगळेच्या मृत्यूमुळे त्याचे अध्यक्षपद मिलिंदकडे येते. तो पँथरचा अध्यक्ष झाल्याने नामांतर लढ्यातही भाग घेतो. या संघटनेत काम करत असतानाच आर.पी.आय चा पुढारी झाल्याने त्याचा पूर्वीचा कॉलेजमित्र रोहिदास नागदिवे या मंत्र्याबरोबर राहून लोकांची व संघटनेची कामे करून घेण्याचा प्रयत्न करतो पण त्याचं कोणतंच काम मंत्र्याच्या हातून होत नाही. त्यामुळे मंत्र्याविरुद्ध त्याच्या मनात तिटकारा निर्माण होऊन तो शिवसेनेत प्रवेश करतो.

यातून लेखकाने एका कार्यकर्त्याच्या सामान्य मागण्या मंत्र्याकडून पूर्ण होत नाहीत या कारणाने तो कार्यकर्ता चिडून दुसऱ्या पक्षात प्रवेश करून आपली कामे करून घेतो याचे चित्रण लेखकाने घडविले आहे.

*** विजय पगारे :**

विजय पगारे हा दलित तरुण महाविद्यालयीन शिक्षण घेत असल्यापासूनच त्याने 'दलित पँथर' संघटनेमध्ये सहभागी होऊन काम करत असतानाच महानगरपालिकेच्या शाळेमध्ये त्याला शिक्षकाची नोकरी मिळते. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने, घरात विजयशिवाय कोणीही मिळवते नसल्याने आई-वडील, भाऊ यांची जबाबदारी अंगावर असल्याने शिक्षण मध्येच सोडून नोकरी करावी लागते. घरच्या जबाबदाऱ्या पार पाडतांनाच विजय पगारेचे लक्ष्मीशी लग्न होते. पण बायकोही कमी शिकलेली असल्याने,

तिलाही नोकरी मिळत नसल्याने एकट्यालाच संसाराचा गाडा ओढावा लागतो. अशातच त्यांच्या संसारवेलीवर 'प्रज्ञा' नावाची कळी उमलते. तिच्या पालनपोषणाबरोबर पुढील शिक्षणाचीही जबाबदारी त्याच्या अंगावर पडते. तुटपुंज्या पगारामुळे महिनाअखेरीपर्यंत ओढाताण होते. या कारणाने श्रीमंत होण्याचा जवळचा मार्ग म्हणून विजय हा आपला कॉलेजमधील मित्र रोहिदास नागदिवे हा समाजकल्याण मंत्री असल्याने माणिकचंद व गोपीचंद यांच्याद्वारे येणाऱ्या लोकांची कामे रोहिदासकडून करून घ्यायची असे ठरवतो. त्या बदल्यात त्या लोकांकडून पैसे घ्यायचे हा दिनक्रम सुरू होतो. पण गौतम गांगुर्डे हासुद्धा कॉलेजमधील मित्र होता. तो मंत्र्याचा पी.ए. म्हणून काम करत असल्याने विजय येणाऱ्या पार्ट्यांचे मंत्र्याकडून काम करून घेण्यासाठी गौतम गांगुर्डेकडे पैसे देतो. गौतम गांगुर्डे कामाचे पैसे घेतो पण मंत्र्याला याबाबत काहीही सांगत नाही व लोकांची कामे होत नाहीत. या कारणाने पैसे परत घेण्यासाठी लोकांची रीघ लागते पण गांगुर्डे विजयचा विश्वासघात करतो. सिताफळेची बदली करण्यासाठी पैसे घेतले पण त्याची बदली झाली नसल्याने तो पैसे परत मागतो विजयने त्याला दमदाटी करताच तो रश्मीचे त्याच्याबरोबरचे फोटो दाखवून विजयची बदनामी करतो. त्याच्या धमकीपुढे विजयचे काहीही चालत नसल्याने तो अपयशी ठरतो.

एक सामान्य तरुण कार्यकर्ता घरच्या गरिबीला कंटाळून लगेच श्रीमंत होण्यासाठी वेगळा मार्ग निवडतो पण इतरांचा विश्वास घात करून स्वत:च त्यामध्ये अडकतो. अशा वेळेस त्याला कोणीही मदत करू शकत नाही. या ठिकाणी लेखकाने दारिद्र्याने, गरिबीने माणूस किती अगतिक होतो याचे चित्रण या पात्राद्वारे केले आहे.

*** गौतम गांगुर्डे :**

गौतम गांगुर्डे हा चळवळ्या तरुण असल्याने महाविद्यालयात असल्यापासून तो अनेक संघटनांमधून सक्रिय कार्यकर्ता म्हणून काम करत असतो. रिपब्लिकन स्टुडण्ट असोसिएशनचा उपाध्यक्ष व 'दलित पँथरचा' तो अध्यक्षही असतो. या संघटनेतल्या

कार्यकर्त्यांसह तो दलितांवर होणाऱ्या अन्याय – अत्याचारांविरुद्ध आंदोलन करून दलितांना न्याय मिळवून देत असे. संघटनेचे काम करत असताना व शिक्षण घेत असताना त्याला शिक्षकाची नोकरी मिळते. शिक्षण बाजूला ठेवून व दलित पँथरच्या जिल्हाध्यक्षपदाचाही राजीनामा देऊन नोकरीवर रुजू होतो पण कालांतराने पैशासाठी तो एके काळच्या संघटनेतील मित्र रोहिदास नागदिवे या मंत्र्याचा पी.ए. म्हणून काम करतो. लोकांची मंत्र्याकडून काम करून घेण्याच्या बदल्यात लोकांकडून तो पैसे घेतो पण कोणाचीही कामे करत नाही. उलट लोकांनी पैसे परत मागितले की त्यांनाच धमकावतो. यावरून त्याची स्वार्थी वृत्ती दिसून येते.

***ईश्वर इंगळे :**

ईश्वर इंगळे हा दलित तरूण असून तो आपल्या समाजाचे छोटे-मोठे प्रश्न सोडविण्यासाठी इतर तरुणांच्या बरोबर शिवसेनेत प्रवेश करतो. त्यावेळी 'दलित पँथर' ही संघटना अस्तित्वात नसते. शिवसेनेत काम करताना दलितांच्या प्रश्नावर कोणीही बोलत नाही उलट स्वार्थासाठी दलित नेत्यांचा वापर केला जातो. तेथे दलित नेत्यांची कोंडी होते. दलित तरूणांना नेतृत्व मिळत नाही. त्यामुळे चिडून ईश्वर इंगळे इतर कार्यकर्त्यांसह 'दलित पँथर' मध्ये प्रवेश करतो. त्याचे इंदिरानगर झोपडपट्टीत साम्राज्य असून दोनवेळा तडीपार झालेला गुंड असतो. पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी त्याने शिवसेनेत प्रवेश केला होता. त्याच भागात मधुकर कावळे हा देखील तडीपार झालेला दादा शिवसेनेत असतो. इंगळे व कावळे यांच्यात स्पर्धा सुरु झाल्याने शिवसेनेचे नेते इंगळेला सतत डावलत असल्याने त्याने 'दलित पँथर' मध्ये प्रवेश केला. गौतम गांगुर्डेला नोकरी मिळाल्याने इंगळे पँथरचा अध्यक्ष होतो. इंगळे निवडणूकीवर बहिष्कार टाकतो, त्यामुळे काँग्रेसची एकगठ्ठा मते कमी होतात. या कारणाने संपूर्ण राजकीय समीकरणच बदलून जाते. मधुकर कावळे शिवसेनेच्या तिकीटावर उभा राहतो. पण हिंदूची मते निरनिराळ्या उमेदवारात विभागली गेल्याने अपक्ष उमेदवार याकूब शेख निवडून येतो. निवडणूक हरलेल्या सर्व उमेदवारांची माथी भडकतात. रात्री त्यांच्या बैठका होऊन ईश्वर इंगळेला मारण्याचा कट रचला जातो.

दुसऱ्या दिवशी सकाळी इंगळे आपल्या अंगणात उभा असताना त्याच्यावर एकामागून एक फैरी झाडल्या जातात आणि क्षणात त्याचा मृतदेह छिन्नविच्छिन होऊन जमिनीवर कोसळतो. भूमिबळकाव आंदोलनात व मशालमोर्चात भाग घेणाऱ्या कार्यकर्त्याचा अंत झाल्याने. एका धडाडी व्यक्तिमत्वाला 'दलित पँथर' संघटना कायमची मुकते.

**३.५) इतर गौण व्यक्तिरेखा :**

**१) निकम मामा :**

निकममामा लाकडाचा व्यापारी असल्याने त्याची लाकडाची वखार होती. महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण करून चार-पाच खोल्या बांधून त्यापैकी काही खोल्या भाड्याने दिल्या होत्या. लाकडाची वखार दंगलीत जळाल्याने एका रात्रीतच निकममामांचे नाव सर्वांना माहित झाल्याने पत्रकार, पुढारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेऊन सांत्वन केले. निकममामाला शासकीय मदत मिळाली. लोकांची सहानुभूती मिळाल्याने राखीव जागेतून महापौर होऊन राजकारण करतो. जिल्ह्यातील साहेबाचा विश्वासू कार्यकर्ता बनतो. बंगल्यात राहून व चांगली कपडे घालून मिरवत असे. त्याच्या भोवती साधे चार कार्यकर्ते नसतानाही तो नेहमी रोहिदास नागदिवे या समाजकल्याण मंत्र्याबरोबर नेता म्हणून फिरायचा. साहेबाबरोबर राहून दौरे करायचा. निकममामा धाडशी असल्याने पोलिसांविरुद्ध वर्तमानपत्रात बातमी देतो. तो लोकांकडून हजार - दिडहजार रुपयांचे हप्ते वसूल करतो या गोष्टीला पोलिसांचा विरोध असल्याने निकममामा पोलिसांना बदनाम करण्यासाठी पोलिसांवर भ्रष्ट आरोप करतो व आपण नामानिराळा राहून राजकारण खेळत असतो.

**२) भीमा भोळे :**

भीमा भोळे हा दलित तरूण महाविद्यालयीन शिक्षणापासून विद्यार्थी संघटनेचा कार्यकर्ता असल्याने त्याच्यासह इतर दलित तरूणांनी 'दलित पँथर' या एकाच मोठ्या संघटनेची स्थापना केली. 'दलित पँथर' संघटनेमुळे दलित तरुणांमध्ये उत्साहाच वातावरण निर्माण झाल्याने दलित समाजाची आशा जागली होती. 'भूमीबळकाव' आंदोलनात भीमा

भोळे इतर कार्यकर्त्यांसह सहभागी होऊन पडीक गायरान जमिनीसाठी सत्याग्रह करतो. नामांतर चळवळीतही भाग घेऊन मोर्चा काढण्याचा निर्णय घेतो. भीमा भोळे रोहिदास नागदिवे या समाजकल्याण मंत्र्याच्या मदतीने लोकांची कामे करून देतो.

**३) रमा बाबर :**

रमा बाबर ही पँथर महिला आघाडीची अध्यक्षा असल्याने इतर कार्यकर्त्यांसह तिने अनेक कार्यक्रमात भाग घेतला होता. दहिटण गावात 'भूमिबळकाव' आंदोलनात त्यांनी सक्रीय भाग घेऊन लोकांचे मनोबले वाढवले होते. रमा बाबर व दयानंद किणीकर चळवळीत काम करत असतानाच एकमेकांकडे आकर्षित होतात आणि चळवळीकडे हळूहळू दुर्लक्ष झाल्याने रमा पूर्वीसारखी चळवळीच्या कामात रस घेत नव्हती. रमा दयानंदच्या लेखणावर प्रेम करायंची. नेहमी चळवळी विषयी बोलणारी रमा आता दयानंदविषयी नेहमी बोलत असायची. पण दयानंद व रमाचे प्रेम सफल होत नाही आणि दयानंद एका विधवा ब्राह्मण मुलीशी लग्न करून संसार थाटतो तर रमा चळवळीला आपले जीवन समर्पित करते.

**४) त्रिशरण :**

त्रिशरण हा दलित लेखक असल्याने त्याला व्याख्यानमालेत प्रमुख पाहुणा म्हणून बोलावले जायचे. त्रिशरणचं शरीर स्थूल आणि बेडौल होते. त्रिशरण हा दयानंद किणीकरचा मित्र असल्याने दयानंदच्या घरी त्याचे येणेजाणे असल्यामुळे त्यांची दलित साहित्यावर चर्चाही व्हायची. त्रिशरणचा कथासंग्रह प्रसिद्ध झाल्याने दलित साहित्याची चळवळ मूळ धरु लागली. तसा त्याला विरोधही होऊ लागला. त्याच्या कथासंग्रहावर टीका होत होती. या कारणाने त्रिशरण दुखावल्याने तो भडभडून बोलत होता. भडव्यांना माझी प्रसिद्धी बघवत नाही. त्यांची चर्चा होत नाही, वर्तमानपत्रात त्याचं नाव कोणी छापत नाही.[१२] त्यामुळे त्रिशरणला एकाकी पाडण्यात येते. त्याच्याविरुद्ध प्रचार सुरू होतो. त्याचा सवर्ण मुलीशी आंतरजातीय विवाह झाल्याने त्याच्याविरुद्धच्या चर्चेला ऊत येत होता.

त्रिशरण एवढा मोठा दलित लेखक असूनही त्याला औषधोपचारासाठी पैसे न मिळाल्याने मरण पावतो. त्याच्यामागे पत्नी आणि दोन मुलं असतात. मुलाला सरकारी नोकरीत घ्यावं आणि त्याच्या पत्नीला मुख्यमंत्री निधीतून मदत मिळावी म्हणून त्याचा मित्र दयानंद प्रयत्न करत असतो पण साहेब आश्वासनाशिवाय काहीच देऊ शकत नाही.

**५) प्रा. राहूल बनसोडे :**

प्रा. राहूल बनसोडे हे दलित समाजातील असल्याने राखीव जागेतून नोकरीस लागले होते. त्यांचा अभ्यास भरपूर असायचा पण उच्चार अशुद्ध व विषयाची मांडणी नीट न करता आल्याने त्यांच्या तासाला नेहमी गोंधळ होत असे. त्यामुळे विद्यार्थी त्यांच्या तासाला बसत नसत. ते नेहमीच नीटनेटके रहायचे पण त्यांचा चेहरा ही त्यांच्या जातीची ओळख होती. प्रा. राहूल बनसोडे हे संघाच्या कॉलेजचे पहिले दलित प्राध्यापक असल्याने त्यांनी विद्यापीठ आणि शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे प्राचार्यपदाची मागणी केली. ते पीएच.डी झालेले व सिनिअर असल्याने त्यांनी नियमाप्रमाणे प्राचार्यपदाचा अर्ज संस्थेकडे केला. पण संस्था संघाची असल्याने संस्थेने राजकारण सुरु करून प्रा. राहूल बनसोडेंना त्रास देणे सुरु केले. आतापर्यंत त्यांना एकदाही मेमो मिळाला नव्हता. पण प्राचार्यपदाची मागणी केल्याने संस्थेकडून त्यांना मेमो देणे सुरु झाले. याचा फायदा विद्यार्थ्यांनी घेतल्याने त्यांच्या तासाला विद्यार्थी गोंधळ घालू लागले. प्रा. बनसोडेंनी प्राचार्य व संस्थेकडे तक्रारी करुनही काहीच फरक पडला नाही. या त्रासाला कंटाळून त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनीही दाद घेतली नसल्याने उलट त्रास वाढतच गेला. विद्यार्थ्यांकडून तक्रारी लिहून घेतल्या गेल्या. प्रा. बनसोडेंच्या विरुद्ध लेखी पुरावे जमा केले. त्यांना शिकवता येत नाही वर्गात विषय सोडून दुसरीच बडबड करतात. मुलींच्या मनात लज्जा निर्माण होईल असे शब्द वापरतात. अशा तक्रारी विद्यार्थ्यांनी लिहून दिल्यामुळे प्रा. बनसोडे सर्व बाजूनी अडकले होते. त्यांच्याकडे विद्यापीठाकडील दिलेली परीक्षेची सर्व कामे काढून घेण्यात आल्याने स्टाफमध्ये त्यांची कुचेष्टा सुरु झाली. प्रा. बनसोडे शिक्षणाने आणि अनुभवाने सर्वात जेष्ठ असल्याने त्यांना

संस्थेतून घालवणे हा एकच उपाय होता. त्यासाठी प्राचार्यांनी प्रा. बनसोडेंना आपल्य केबिनमधून बोलावून घेतले व केबिनमध्ये कोंडून गुंडांकडून त्यांना मारहाण करण्यात आली. ''कॉलेज सोडून जा, नाही तर आमच्याशी गाठ आहे. ''[१३] असा प्राचार्यांनी दम दिला प्रा. बनसोडे एकटे पडले होते. म्हणून त्यांनी राजीनामा देऊन संस्थेची वाट मोकळी केली.

**६) याकूब शेख :**

याकूब शेख हा शकीलाचा मुलगा आणि अनिरुद्ध देशमुखचा लहानपणीचा मित्र. याकूबचे शिक्षण फारस झाले नसल्याने सुरुवातीला रिक्षा चालवून आपला उदरनिर्वाह करायचा. कालांतराने त्याने अनेक लोकाकडून खंडणी वसूल करुन हॉटेल व्यवसायात जम बसविला होता. त्यांचे 'हॉटेल दिल्ली दरबार' नॉन व्हेजसाठी प्रसिद्ध होते. लोकांच्याकडून खंडणी वसूल केल्याबद्दल याकूब शेखवर अनेक गुन्हे होते. तो दलित चळवळीत काम करु लागल्यामुळे त्याच्या मागचा पोलिसांचा ससेमिरा कमी झाला होता. दलित चळवळीला सढळ हाताने मदत करत असल्याने प्रा. राहूल बनसोडे यांनी त्याला दलित चळवळीच्या कार्यकारिणीवर घेतल्याने चळवळीतील एक निष्ठावान कार्यकर्ता म्हणून त्याचा उल्लेख होत होता.

**७) अनिरुद्धचे बाबा :**

अनिरुद्धचे बाबा देशमुख देशस्थ ब्राह्मण चार माणसांच कुटुंब शिवाय घरची परिस्थिती गरीबीची असल्याने घराघरात पूजा सांगूनच उदरनिर्वाह करावा लागे. यातून मिळणाऱ्या पैशातूनच अनिरुद्धच्या बाबांनी विठ्ठलाच मंदिर बांधल. गावात हायस्कूल काढायला मदत केली. सनातनी स्वभाव असल्याने घरात नेहमी सोवळ - ओवळ असायचे. बाबा नेहमी पूजा वाचत असल्याने लोक त्यांना नेहमी गुरुजी म्हणायचे. महात्मा गांधीजींची हत्या एका ब्राह्मणाने केल्याने सर्वत्र ब्राम्हणांविरोधी सूडाची लाट उसळली. अनेक ठिकाणी ब्राह्मणवाड्यावर हल्ले झाले. ह्या दंगलीच लोण खेडोपाडी पोहचल्याने त्यात अनिरुद्धच्या बाबांचही घर भस्मसात झाल. सर्व गाव एकत्र येऊन देव जाळले, पोथ्या जाळल्या.

वडिलांची विटंबना केली. याकारणाने अनिरुद्धच्या बाबांनी भावना, अनिरुद्ध आणि पत्नी यांच्याबरोबर कायमचे गाव सोडले. त्यांची पत्नी खूपच सोशीक होती. झालेल्या अपमानाचा धक्का सहन न झाल्याने आजारपणात पत्नीच निधन झाले. दोन्ही मुल पोरकी झाली पग अनिरुद्धच्या बाबांनी भिक्षुकी करुन वाढवलं. शिक्षण दिलं. अनिरुद्ध शिक्षण घेऊन फौजदार होतो. सुरुवातीला बाबांच्या मनात दलितांविषयी अस्पृश्यतेची भावना होती. पग कालांतराने परिस्थितीनुसार त्यांच्या मनात बदल होतो. आपली मुलगी भावना विधवा झाल्यानंतर एका दलित मुलाशी विवाह करण्यास संमती देतात.

*** नाजूका मावशी :**

नाजूका मावशी ही दयानंद किणीकरची मावशी दयानंद लहान असताना त्याचे वडील ट्रक अपघातात वारल्यानंतर त्याची आई दुसरे लग्न करते आणि दयानंद पोरका होतो. दयानंदला लहानाचा मोठा नाजूका मावशीच करते. आपल्या पोटच्या मुलाप्रमाणे दयानंदचे लाड पुरवते. स्वत: कष्ट करुन मोलमजूरी करुन त्याला शिक्षण देते. शिक्षण घेऊन दयानंद प्राध्यापक होतो. एका ब्राह्मण विधवा मुलीशी भावनाशी विवाह करतो. त्यांच्या संसारवेलीवर विवेक नावाच सुंदर फुल उमलत. पण या विवाहाने नाजूका मावशी आनंदीत नसते. तिला ब्राह्मण मुलगी सून म्हणून नको असते. पण भावनाचा स्वभाव प्रेमळ असल्याने नाजूका मावशीच्या क्रोधाला लवकरच जिंकते. दयानंदवर नाजूका मावशीचा जीव असल्याने दयानंद प्राध्यापक झाल्यावरसुद्धा मावशी त्याला सागूती घेऊन जाते. दयानंद प्राध्यापक झाल्यावरसुद्धा नाजूका मावशी त्याच्या आवडी-निवडी जपते.

*** भावना :**

भावना ही एका सनातन ब्राह्मण कुटुंबातली मुलगी घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने वडिलांनी पूजापाठ सांगून व भिक्षुकी मागून लहानाचे मोठे केले. वडिलांनी भावनाच लग्न लावून दिले पण वडीलांना मुलाची सर्व खरी माहिती मिळाली नाही. भावनाच्या नवऱ्याला फेफरे येत होते. याची जराही कल्पना भावनाला नव्हती. आपल्या

नवऱ्याला फेफर येते हे तिला माहिती होते. त्याचवेळेस भावनाचा नवरा आत्महत्या करतो. लग्न होऊन एक महिन्यातच भावना विधवा होते. सासरची मंडळी भावनाला दोषी ठरवतात. मुलीची खोटी पत्रिका दाखवली म्हणून भावनाच्या वडिलांशी भांडण काढतात. हे सर्व तिच्या भावाचे अनिरुद्धचे मित्र पाहतात. दयानंद हा दलित मुलगा होता. त्याला भावना आवडत असल्याने तो भावनाशी प्रेमविवाह करतो. सुरुवातीला या गोष्टीला भावनाच्या वडीलांचा व दयानंदच्या मावशीचा विरोध होता. दयानंदने एका विधवा ब्राह्मण मुलीशी लग्न करुन संसार थाटला होता. त्यांच्या संसारवेलीवर एक सुंदर फूल उमलते. सुरुवातीला भावनाच्या आंतरजातीय प्रेमविवाहाबद्दल नाराज असणाऱ्या बाबांच्या मनात परिवर्तन होते आणि स्वत:हून ते भावनाचा संसार पहायला येतात. भावनाचा संसार पाहून आपल्या मनातील जातीयतेच्या कलंकाला कायमच पुसून टाकतात.

*** मराठे हवालदार :**

मराठे हवालदार पोलिस खात्यात नोकरीला होते. तालुक्याच्या ठिकाणी नोकरी असल्याने ते अनिरुद्धच्या गावात रहायचे. अनिरुद्धचे वडील त्यांच्या घरी पूजा वाचयचे त्यामुळे अनिरुद्ध आणि त्यांची ओळख होती. मुलांच्या शिक्षणासाठी ते जिल्ह्याच्या ठिकाणी बदली करून घेतात. अनिरुद्ध शिक्षणासाठी गेला असताना त्याला तेथे मराठे हवालदार भेटतात. अनिरुद्धला वसतीगृहातील दलित विद्यार्थी त्रास देत असतात. त्यासाठी मराठे हवालदार अनिरुद्धला वसतीगृहात दुसरी खोली मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात. पुढे अनिरुद्ध शिक्षण घेऊन पोलिस खात्यात फौजदार होतो, आणि मराठे हवालदाराच्या मुलीशी आंतरजातीय विवाह करतो. या विवाहाला मराठे हवालदार मान्यता देतात आणि स्वखुशीने अनिरुद्धचे आपल्या मुलीशी लग्न लावून देतात.

*** चंद्रकांत आंभोरे :**

चंद्रकांत आंभोरे हा मिलिंद कांबळे, रोहिदास नागदिवे, गौतम गांगुर्डे, भीमा भोळे यासारख्या अनेक कार्यकर्त्यांच्या बरोबर दलित चळवळीत काम करणारा त्यांच्यासारखाच

सामान्य कार्यकर्ता. चळवळीत काम करित असतानाच काही कार्यकर्त्यांना नोकरी मिळाल्याने चळवळ सोडली, कालांतराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळीत फूट पडून अनेक गटात चळवळ विभागली गेली. एकेकाळी निस्वार्थीपणे एकत्र काम करणारे कार्यकर्ते निवडणुका लढवून एकमेकांचे शत्रू झाले. रोहिदास नागदिवे हा समाजकल्याण मंत्री दुसऱ्यांदा निवडणुकीत उभा राहतो पण त्याला शह देण्यासाठी चंद्रकांत आंभोरे उभा राहतो. पण रोहिदास निवडणुक हारतो. व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणदिनी आदरांजली वाहण्यासाठी रोहिदास चैत्यभूमीवर जातो. त्यावेळी चंद्रकांत आंभोरेचे कार्यकर्ते त्याला धक्काबुक्की करुन खाली पाडून मारहाण करतात. रोहिदासला बाबासाहेबांचे दर्शन घेऊ देत नाहीत. चंद्रकांत आंभोरे राजकीय क्षेत्रात आपले वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न करतो.

### ३.६) दलित पँथर संघटना :

दलित विद्यार्थ्यांच्या तालुका पातळीवर वेगवेगळ्या नावाच्या अनेक संघटना होत्या. कोणी आपल्या संघटनेच नाव 'दलित युवक आघाडी', कोणी 'रिपब्लिकन युवक आघाडी' तर कोणी ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टुडंण्ट असोसिएशन'' इत्यादी नावाच्या संघटना स्थापन केल्या होत्या. याशिवाय गल्ली व चौकापुरत्या अनेक संघटना अस्तित्वात होत्या. पण या सर्व संघटनांना एक व्यासपीठ नव्हतं की राज्यपातळीवर संघटनांच जाळ नव्हतं. ह्या सर्व संघटना सुट्या असल्यामुळे त्यांचे प्रश्न शासनदरबारी मांडले जात नव्हते. वर्तमानपाकडून जनआंदोलनाचा प्रभावी रेटा उभारला जात नव्हता यासाठी सर्व छोट्या-छोट्या संघटना एका बॅनरखाली येऊन 'दलित पँथर' ही एकच मोठी संघटना स्थापन झाल्यामुळे दलितांना आपल्या अन्याय अत्याचारा विरुद्ध आवाज उठविण्यासाठी एक महत्वाच असे हक्काचे व्यासपीठ मिळाल्याने दलित तरुणांमध्ये उत्साहाच वातावरण निर्माण झाले. दुसऱ्या संघटनेतील अनेक कार्यकर्ते या संघटनेमध्ये प्रवेश करत होते. यामुळेच 'दलित पँथर'

संघटनेमागे भक्कम ताकद निर्माण झाल्याने अनेक वस्त्यांमध्ये 'दलित पँथर'च्या उपशाखा ही स्थापन झाल्या.

## ३.७) नामांतर चळवळ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्यासाठी 'दलित पँथर' संघटनेने चळवळ उभारली. बाबासाहेबांच्या नावावर प्रेम करणाऱ्या हजारो दलित तरुणांनी संघर्षात उडी घेतली. नामांतराच्या प्रश्नावर सर्व मराठवाडा पेटून उठल्याने सवर्ण लोकांनी बौद्धांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. नामांतराच्या प्रश्नाने उग्र रुप धारण केल्यामुळे अनेक हिंसक कारवायांना खतपाणी मिळत होते. बाबासाहेबांच्या विचारामुळे दलित समाज भारावून गेला होता. दलितांनी धर्मांतर करून गावकी नाकारली, शिक्षण घेऊन शासकीय नोकऱ्यात प्रवेश मिळवला. 'नामांतराच एक निमित्त घडलं. हजारो वर्षांची सनातन संस्कृती आणि अस्पृश्यांचा स्वाभिमान ह्यात युद्ध पेटलं. नामांतर हे केवळ नामांतर नव्हतं. एका इमारतीला एका व्यक्तीच नाव देणं एवढं हे सोप गणित नव्हतं[१४] हे वैदिक - अवैदिक संस्कृतीमध्ये पुरातन काळापासून सुरु असलेल्या संस्कृती संघर्षाच वर्तमान रुप होते.
१४ (पृ. ७१)

## ३.८) प्रसंग :

'उपल्या' कादंबरीत अत्यंत अस्वस्थ करणारे आणि मन सुन्न करणारे अनेक प्रसंग येतात. 'उपल्या' मधील प्रसंग कधी चांगले तर कधी वाईट आले आहेत. आज सुद्धा दलित समाजाप्रमाणे ब्राह्मण समाजातसुद्धा लोक रुढी परंपरा, अंधश्रद्धांना बळी पडताना दिसून येतात. ब्राह्मण समाजातील भावना विधवा होते. या प्रसंगाशी वाचकसुद्धा एकरुप होऊन जातो. भावनाचा नवरा वयाने मोठा होता. शिवाय त्याला फेफरं येण्याचा आजारही होता. ज्यावेळी ही गोष्ट भावनाला समजली तेव्हा त्याने आत्महत्या केली. भावना विधवा झाल्याने तिच्या सासरच्या लोकांनी भावनाचे दागिने काढून घेतले. हातातील काकण उतरली तिचा

मंगळसुत्राचा धनी गेल्याने तिचा चेहरा आक्रोशाने मलूल झाला होता. भावनावरील आक्रोश व्यक्त करत त्यावेळी घरातील वृद्ध, विधवा तणतणत बाहेर येत होत्या.

'हिचं वपन करा आणि बांड नेसायला द्या. हिचा पायगुण भोवला भावनाचा सासरा पुढे आला, पण त्याच्या चेहऱ्यावर चिता जळत असल्याचे दिसून येते.

'तुम्ही तुमच्या मुलीची खोटी पत्रिका दाखवलीत. फसवलतं आम्हाला आतापर्यंत शांत असणारा अनिरुद्ध भडकला. 'कुणी कुणाला फसवलयं ? नवऱ्या मुलाला फेफर होत, हे तुम्ही लपवून का ठेवलं ? [१५] वरील प्रसंगावरुन ब्राह्मण विधवांच दु:ख भयानक असल्याचे दिसून येते. जुन्या रुढी परंपरेची बळी झालेली भावना आपल्या डोळ्यापुढे जशीच्या तशी उभी राहते. अशा स्वरुपाचा प्रसंग वाचताना रुढ परंपरेबद्दल मनात चीड निर्माण होते. तर काही प्रसंगातून स्वार्थी लुटारू वृत्ती दिसून येते. पंडित कानडे ड्रायव्हर सिताफळेकडून बदली करण्यासाठी पैसे घेतो त्याबरोबरच हॉटेलमध्ये पार्ट्याही देतो. पंडित कानडे काम करण्यासाठी मंत्र्याचा मित्र मिलिंदला गाठतो. त्याला साहेबाच्या शिफारशीने काम करून घेण्यास सांगतो. या प्रसंगाचे सद्यस्थितीचे चित्रण लेखक शरणकुमार लिंबाळेनी करून माणसातील स्वार्थी वृत्तीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. हे खालील प्रसंगावरुन दिसून येते.

> ''बरं झाल, तू आलास.'' मीच तुझ्याकडं येणार होतो. एक काम, आलय.
>
> 'कसल कामं आहे'?
>
> 'बदलीच, एस.टी. ड्रायव्हर आहे.
>
> 'होईल का बदली ?

'कुठलही काम होत नाही' म्हणायचं नाही. न होणारं कामही 'करतोच' म्हणायचं. गेल्या आठवड्यात रोहिदासच्या डी.ओ.नं. एका कंडक्टरची बदली झाली. आपण मुंबईला जाऊ'.

'काम नाही झाल, तर ?

'आपण फक्त मिनिस्टरच पत्र घेऊन द्यायचं. बदली होवो, न होवो, पार्टी खर्च करायला तयार आहे.'

'लोक खाऊ घालतात, पिऊ घालतात ................ ?'

'घालू दे ना, आपण त्यांना मिनिस्टरची भेट घडवून देतो'.

शिफारस मिळवून देतो !

'मिनिस्टरची भेट घेतल्यानं, त्याचं पत्र घेतल्यानं, काम होत नाहीत'.

'आपण पार्टीला मुंबईला न्यायचं. तो आपला खर्च करेल. पार्टीच्या खर्चान साहेबाची भेट घेऊ व मुंबईत दोन दिवस मजेत राहू [१६]

या प्रसंगातून कादंबरीकाराने माणसाच्या स्वार्थी वृत्तीचे दर्शन घडविले आहे. लोकांची कामे होवो ना होवोत पण स्वत:ची तुंबडी भरून घेण्यात लोक पटाईत असतात. या प्रसंगातून कामासाठी पैसे देणाऱ्या व्यक्तीची फसवणूक होताना दिसते. शरणकुमार लिंबाळेनी 'उपल्या' कादंबरीतील अनेक प्रसंगातून प्रामाणिकपणे आपला मूल्यविचार व सद्यपरिस्थिती मांडली आहे. कादंबरीतील अनेक प्रसंग वाचताना मन सुन्न होते. त्यामुळे वाचकही त्या प्रसंगाशी एकरुप होऊन जातो.

### ३.५) मनोविश्लेषण :

'कादंबरी' हा कादंबरीकाराच्या मनाचा सत्याधारीत पण काल्पनिक खेळ असतो. कारण 'पात्रपरिपोष' करताना पात्राच्या मन:सृष्टीचे यथार्थ चित्र रंगविणे हाच खरोखर महत्वाचा भाग मनोविश्लेषणातून व्यक्त होत असतो. मनोविश्लेषणात एका विशिष्ट मन:प्रवृत्तीवर भर दिला जातो. या मन:प्रवृत्ती वरुनच व्यक्तिची एक विशिष्ट मनोरचना होऊन त्या व्यक्तिच्या किंवा पात्राच्या वर्तनाच्या मागचे हेतू, मनाच्या क्रिया प्रतिक्रिया यांचे अचूक वर्णन केले जाते. 'मनाचे अशा प्रकारचे सूक्ष्म परीक्षण करून त्यातील सूक्ष्म प्रवृत्तींचा व आकांक्षाचा छडा लावणे म्हणजेच मनोविश्लेषण होय[१७] अशी व्याख्या प्र.वा. बापट,

गोडबोलेनी केली आहे. म्हणजे मानवी मनाचे यथार्थ चित्रण करणे तर डॉ. नंदा मेश्राम मनोविश्लेषणाविषयी आपले मत मांडताना म्हणतात की, ''मानवी मनाचे स्वभावाचे अंतरंगाचे अचूक व मार्मिक वर्णनाचे विशदीकरण म्हणजेच मनोविश्लेषण होय.''[१८] (पृ. २९) मानवी मनाची रहस्ये शोधण्यासाठी मनोविश्लेषणाला कादंबरीमध्ये फार महत्व आहे.

ना.सी. फडके, ह.ना. आपटे या श्रेष्ठ कादंबरीकारांप्रमाणेच लेखक शरण कुमार लिंबाळेंनी 'उपल्या' कादंबरीच्या लेखनात 'अनिरुद्ध' या व्यक्तिरेखेचे मनोविश्लेषण व त्याची मानसिकता आणि वैचारिकता स्पष्ट केली आहे. मनोविश्लेषण लेखनातून व्यक्तिरेखेची व त्या प्रसंगाची भावनिकता दिसून येते.

अनिरुद्धचा रुमपार्टनर मिलिंद व त्याचा मित्र रोहिदास हे दलित विद्यार्थी असून त्यांना स्कॉलरशिप मिळूनही व्यवस्थित शिक्षण घेत नाहीत. शिक्षणापेक्षा चळवळीत स्वत:ला गुंतवून घेतात. रुममध्ये सतत अभ्यासापेक्षा चळवळीच्या चर्चा करतात यावरुन त्याचे मन विचार करू लागते – 'माजलेत' सरकार ह्यांना सवलती देतं हे मात्र बिड्या ओढतात. गोंधळ घालतात. सिनेमा पाहतात, फुकट शिष्यवृत्ती घेतात. होस्टेलमध्ये कचरा भरला आहे. थर्ड क्लासची मुलं शिकत आहेत. त्यांना सहज प्रवेश मिळतो. आणि आम्ही हुशार असूनही प्रवेश नाही. आम्ही सवर्ण आहोत. ह्यात आमचा काय दोष ? जे गादीवर होते ते, जोड्याजवळ बसत आहेत आणि जोड्याजवळचे सिंहासनावर आम्ही महार – मांग असतो तर बरं झालं असतं. सवलती मिळाल्या असत्या. सरकार कमअस्सल लोकांना उत्तेजन देत आहे. सरकारनं अशा लोकांवर पैसा का खर्च करावा ? दलितांच्या मतांसाठी सरकार त्यांना खुश करत आहे. मला तर वाटतं, ह्या सर्व महार-मांगाना एकत्र करावं आणि त्यांच्यावर बॉंब टाकावा.''[१९] (पृ. १४,१५) अनिरुद्धच्या या मनोविश्लेषणातून दलित समाजाविषयी चिड दिसून येते.

अनिरुद्ध ज्या समाजात जन्मला त्या समाजाची मानसिकता वेगळी असते. दलितांना मिळणारी वागणूक त्याच्या समाजात नसते. दलिताप्रमाणे आपल्याला जर वागणूक मिळाली

असती तर आपण जगूच शकलो नसतो. आजपर्यंत त्याला स्वत:चेच दु:ख मोठे वाटत होते. रोहिदासने जेव्हा दलित समाजाला भोगाव्या लागणाऱ्या यातना सांगितल्या तेव्हा तो मनात विचार करतो की –

'आजवर मला माझंच दु:ख मोठं वाटतं होतं. आपला छळ होतोय. आपण दरिद्री आहोत असं वाटायचं. पण आज मला आत्मबळ मिळालं होतं. माझ्यापेक्षाही दु:खाने गांजलेले अनेकजण आहेत. त्यांच्यापेक्षा मी सुखी आहे. दलितांचं जीवन किती भयावह आहे. त्यांचं दु:ख माझ्या वाट्याला आलं असतं तर मी जगूच शकलो नसतो. आपण उगीच आपल्या दु:खाला कुरवाळतोय.'[२०]

अनिरुद्धच्या या मनोविश्लेषणातून लेखक शरणकुमार लिंबाळेंनी सुरुवातीला ब्राह्मणांचे दलिताबद्दल असणाऱ्या विचारात व नंतरच्या विचारात खूप परिवर्तन झाल्याचे दर्शन घडविले आहे. अशाप्रकारे कादंबरीतील अनिरुद्ध या व्यक्तिरेखेच्या मनोविश्लेषणातून त्याची संयमी व सहनशील व्यक्तिरेखा दिसून येते.

'उपल्या' या कादंबरीमधून दलित चळवळीच्या एकाधिकारशाहीचे चित्रण कादंबरीकाराने प्रभावीपणे मांडले आहे. या कादंबरीचे कथानक, आशय, व्यक्तिचित्रांचा विचार करता 'उपल्या' हे नाव सार्थक असल्याचे वाटते. कारण वानरामध्ये 'उपल्या' नावाची जात असते तो वानराच्या टोळीचा नायक असल्याने त्याला भोगात दुसरा भागीदार नको असतो. त्याप्रमाणेच समाजातह दलित चळवळीमध्ये 'उपल्या' ची वृत्ती दिसून येते.

**निष्कर्ष :**

१) 'उपल्या' या कादंबरीमधून तत्कालीन एका सनातन कर्मठ ब्राह्मण कुटुंबातल्या मुलाच्या दलितीकरणाचा एक पट चित्रित झाला आहे.

२) दलित नेतृत्वातील अस्तित्वहिनता आणि कार्यकर्तृत्वातील असमर्थता याचे सूक्ष्म चित्रण शरणकुमार लिंबाळे अतिशय समर्थपणे करतात.

३) कार्यकर्त्यांच्या निवेदनातून वर्तमानातील इतिहास मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

४) राजकीय प्रश्नांची चर्चा करता - करता समकालीनतेचा एक भाग म्हणून आंतरजातीय विवाहाचा भाग या कादंबरीमध्ये येतो व क्षमताधिष्ठित मूल्य प्रस्थापित करु इच्छितो.

५) शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा या स्वत:चे वेगळे अस्तित्व जपणाऱ्या आहेत. चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही प्रवृत्तीचे चित्रण या कादंबरीतील व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून दिसून येते.

६) डॉ. बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळीत फूट पडल्याने अनेक गट निर्माण झाले. गटातून वाढत जाणारी स्पर्धा व लोकांनी आपल्यामागे येण्यासाठी कार्यकर्त्यांनी योजलेल्या नविन युक्त्या यांचे चित्रण या कादंबरीतून येते.

७) दलित चळवळीने समाजव्यवस्था आणि शासन ह्यांच्याशी दिलेला संघर्ष आणि संघटित होऊन संघर्ष करण्याच्या वृत्तीवर प्रकाश टाकलेला आहे.

८) 'उपल्या' ही कादंबरी चार भागात विभागली असल्याने प्रत्येक भागात येणाऱ्या घटना आणि नायक वेगळे असल्याने कादंबरीत एकसंधपणा जाणवत नाही.

## संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १) | प्र.वा. बापट, ना.वा. गोडबोले | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास व्हीनस प्रकाशन पुणे, तिसरी आवृत्ती, १९७३ पृ. ८९ |
| २) | तत्रैव | पृ. १०५ |
| ३) | शरणकुमार लिंबाळे | 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती (१९९८) पृ. १५ |
| ४) | तत्रैव | पृ. ३१ |
| ५) | तत्रैव | पृ. २३ |
| ६) | तत्रैव | पृ. ९७ |
| ७) | श्री. मा. कुलकर्णी | कादंबरीची रचना, उन्मेष प्रकाशन नागपूर, १९५६ पृ. ९३ |
| ८) | उनि | पृ. ११४, मराठी कादंबरी तंत्र आणि विकास |
| ९) | उनि | पृ. ३१, 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन पुणे |
| १०) | तत्रैव | पृ. ६१, 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन पुणे |
| ११) | तत्रैव | पृ. ६४, 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन पुणे |
| १२) | तत्रैव | पृ. ९४, 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन पुणे |
| १३) | तत्रैव | पृ. ९६, 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन पुणे |
| १४) | तत्रैव | पृ. ७१, 'उपल्या' |
| १५) | तत्रैव | पृ. ८२ |
| १६) | तत्रैव | पृ. १२१ |
| १७) | प्र. वा. बापट, ना.वा. गोडबोले | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास व्हीनस प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती १९५७ पृ. ११७ |
| १८) | डॉ. नंदा मेश्राम | दलित कादंबरी स्वरुप आणि समिक्षा, डिंपल |

पब्लिकेशन, १६, प्रथमावृत्ती डिसें. २००६ पृ. २९

१९) शरणकुमार लिंबाळे — उपल्या – दिलीपराज प्रकाशन पुणे, पृ. १४,१५

२०) तत्रैव — पृ. २३